# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

**MARATHI**

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE

REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | SEPTEMBER 2023 | No. 08


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

स्तोत्र : १०१:१-८

१) दया व न्याय या विषयी मी गाणे गाईन; हे परमेश्वरा, मी तुझी स्तोत्रे गाईन.

२) मी अव्यंग मार्गावरुन सद्बुद्धिने चालेन तूं माझ्याजवळ केव्हा येशील?

३) मी अनुचित गोष्ट आपल्या नेत्रांपुढे येऊ देणार नाही; अनाचाराचा मी तिरस्कार करतों, तो मला बिलगणार नाही.

४) हृदयाची कुटिलता मला सोडून जाईल; मी वाइटाशी परिचय ठेवणार नाही.

५) आपल्या शेजाऱ्याची गुप्तपणे चहाडी करणाऱ्याचा मी विध्वंस करीन; जो कुर्रेबाज व गर्विष्ठ मनाचा आहे त्याची मी गय करणार नाही.

६) देशांतील भाविक जन मजजवळ राहावे म्हणून मी त्यांजवर दृष्टि ठेवितो; सात्विक मार्गानें चालणारा माझा सेवक होईल.

७) कपट करणाऱ्याला माझ्या घरात थारा मिळणार नाही; असत्य बोलणारा माझ्या दृष्टिपुढे टिकणार नाही.

८) रोज सकाळी मी देशांतल्या सर्व दुर्जनांचा विध्वंस करीत जाईन, म्हणजे परमेश्वराच्या नगरांतून अधर्म करणाऱ्या सर्वांचा उच्छेद होईल.



# भिऊ नको!

FEAR NOT! यशया ४१:१०

## संदेश जो तुमचा विश्वास वाढवेल! ते आतुरतेने वाचा!!

*(पास्टर एस्. सॅम. सेल्वाराज)*

काहि लोक असे म्हणत असत, ‘‘मी दररोज सकाळी उठतो ते केवळ वर्णन करु न शकणाऱ्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी.’’ त्या समस्या शारिरीक आणि भावनिक कौटुंबिक समस्या. अनेक जण त्रासामागुन त्रासा द्वारे पीडीत आहेत आणि ते चिंता करीतात. पुष्कळ वेळा ते असे म्हणत, ‘‘हे सर्व हाताळणे माझ्या आवाक्या बाहेरचे आहे. माझ्या समस्या मला पराभूत करण्याकरिता मजवर येतात! या समस्यांशी सामना करण्याची मजमध्ये आता शक्ति नाही. मी आता यातून कसा बाहेर पडणार?’’ कदाचीत आज हाच तुमचा अनुभव असेल.

आमच्या सेवा कार्यात, आमच्याकडे दररोज कठीण परिस्थितीतून जावे लागत असलेल्या अनेक संतजनांची पत्रे येत असतात. काहि दिवस या पत्रांपैकी काही पत्रे वाचण्यात माझा अर्धा दिवस खर्च झाला.

एका धार्मिक स्त्रीने कळविले. ‘‘माझा पस्तीस वर्षांपूर्वी विवाह झाला आणि आता मी आजी आहे’’. परंतु आता माझ्या पतीद्वारे माझ्या कुटुंबाचा नाश होत आहे. ते देवाचे

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता    रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



REACHING NATIONS

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**CHIEF EDITOR**

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**

Bro. N. Prakasam, M.A., General Manager
Dr. Rabinder Boaz, M.S.
Bro. K. Puratchivendan

**EDITORIAL BOARD**

Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.
Rev. Dr. K.R. Rajasekaran

**EDITOR, PUBLISHER & PRINTER**

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.

Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

**E.mail ID**

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**

Echo of His Call


**"जो सर्वात लहान त्याचे सहस्त्र होतील, जो क्षुद्र त्याचे बलाढ्य राष्ट्र होईल, मी परमेश्वर हे योग्य समयीं त्वरित घडवून आणीन."**
(यशया ६०:६२)

प्रभुमधील प्रियांनो!

आम्ही आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नामात शुभेच्छा व्यक्त करितो.

तुम्ही सर्व सुस्थितीत आहात असा विश्वास बाळगतो. आम्ही दररोज तुम्हांकरिता प्रार्थना करीत असतो. देव तुमच्या बरोबर आहे तेव्हा धैर्यशील राहा.

देवाचा सामर्थ्यशाली हात आम्हाला आमच्या अलीकडील सेवाकार्यासंबंधीत प्रवासात, आामच्या सर्व प्रयत्नात आणि कार्यात मार्गदर्शन करीत आला आहे. प्रभु येशू ख्रिस्त रात्र-दिवस न झोपता आमच्या सोबत होता. स्वर्गीय पिता तुम्हाला देखील विपुल आशीर्वाद देवो.

आमच्या सेवेत अनेक देवाचे सेवक आहेत त्यांच्या कुटुंबातील अनेक जण आजारी आहेत. त्यामुळे दुर्दैवाने त्यांना त्यांची जबाबदारी पूर्णपणे पार पाडण्यात अडखळण ठरली. या बाबतीत आम्ही तुमच्या प्रार्थनांची अपेक्षा करीत आहोत. हे अतिशय निकडीचे आणि महत्वाचे आहे.

आमच्या निदर्शनास आले आहे; की आम्ही प्रत्येक महिन्याला परिश्रम घेऊन पाठवित असले **एको ऑफ हिज कॉल** मासिक तुमच्यापैकी अनेकांना मिळत नाही.

आम्ही सर्वतोपरी काय घडत आहे हे शोधण्याचा प्रयत्न करीत आहोत, कारण मासिकाच्या पुष्कळशा प्रती. दाराला कुलूप होते, व्यक्ति मृत झाली आहे आणि मासिक स्विकारण्यास नकार दिला अशा विविध कारणांनी आमच्याकडे परत येत आहेत. प्रियांनो, तुम्ही आमच्यां करीता अति विशेष असे आहा; त्यामुळे तुमची सहभागीता आम्हाला गमवावयाची नाही. तेव्हा तुम्हाला विशिष्ठ तारखे पर्यंत मासिक प्राप्त झाले नाही तर जसे पत्रा द्वारे, ई:मेल, व्हॉटस् ॲप किंवा दूरध्वनि द्वारे कळवा तुमचा घरचा पत्ता बदलला असल्यास जुन्या पत्यासहित नवा पत्ता तसेच ई-मेल कळवा, म्हणजे मासिक पाठविण्यास अडचण येणार नाही. देव तुम्हाला आशीर्वाद देवो!

आम्ही सोळा भाषांतील आमचे मासिक नियमितपणे खाली नमुद केलेल्या तरखांना पोस्टा द्वारे पाठवित असतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | तामिळ | - | अगोदरच्या महिन्याच्या २८ तारखेस |
| २) | इंग्रजी | - | प्रत्येक महिन्याच्या २ तारखेस |
| ३) | सिंहला | - | प्रत्येक महिन्याच्या २ तारखेस |
| ४) | आफ्रिकन | - | प्रत्येक महिन्याच्या ४ तारखेस |
| ५) | मल्यालम | - | प्रत्येक महिन्याच्या ४ तारखेस |
| ६) | तेलगु | - | प्रत्येक महिन्याच्या ६ तारखेस |
| ७) | हिन्दी | - | प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेस |
| ८) | कन्नड | - | प्रत्येक महिन्याच्या १० तारखेस |
| ९) | मराठी | - | प्रत्येक महिन्याच्या १२ तारखेस |
| १०) | आसामी | - | प्रत्येक महिन्याच्या १२ तारखेस |

| | | |
|---|---|---|
| ११) बंगाली | - | प्रत्येक महिन्याच्या १४ तारखेस |
| १२) ऊर्दु | - | प्रत्येक महिन्याच्या १४ तारखेस |
| १३) नेपाली | - | प्रत्येक महिन्याच्या १६ तारखेस |
| १४) गुजराथी | - | प्रत्येक महिन्याच्या १६ तारखेस |
| १५) उडीसा | - | प्रत्येक महिन्याच्या १८ तारखेस |
| १६) पंजाबी | - | प्रत्येक महिन्याच्या २० तारखेस |

आम्ही आमच्या वेबसाईट www.echoofhiscall.org वरील तारखांना अपलोड करीत असतो. तेव्हा पर्यायी म्हणून उपयोग करा. **एको ऑफ हिज कॉल** मासिकाचे सर्व संदेश प्रथम इंग्रजी भाषेत लिहिले जातात आणि त्यानंतर सहसंपादकांच्या द्वारे भाषांतरीत करुन इंग्रजी नमुन्यानुसार टंकलिखीत करुन आमच्याकडे पाठवण्यात येतात.



प्राप्त झालेल्या भाषांतरीत पानांची छपाई, घडी, विभागवार छाटणी, त्यांचा गठ्ठाकरुन पोस्टात ठिक तारखेला पाठवण्यात येतात. कृपया या सेवाकार्यात व्यस्त असलेल्या ७५ कर्मचारीवर्गाचा विचार करा! हे मासिक जगभरातील भाषा, संस्कृती, देश यातील अनेकांच्या जीवनाला स्पर्श करीत असल्यामुळे सैतान आमच्या या कर्मचाऱ्यांच्या आत्मिक जीवनावर आघात करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

सेवेत कोणत्याही मार्गाने सहभागी होण्यासाठी अंत:करणाची तयारी करा.

आम्हाला प्रार्थना करण्याकरीता प्रार्थना भागीदार आणि स्वत:च्या भाषेतील मासिकाचे वाचन करुन त्यामध्ये सुधारणा सुचवणाऱ्या आणि अभिप्राय देणाऱ्या मानद समन्वयकांची गरज आहे. आम्हाला ही मासिक सेवा अधिक परिणामकारक करण्याची इच्छा आहे.

तुमच्या प्रतिसादाची अतुरतेने वाट पाहात आहोत. संयमाने संपादक वाचण्यास वेळ दिल्याबद्दल आभारी आहोत.

देवांची शांती तुम्हाबरोबर राहो!

ख्रिस्त येशूमध्ये तुमचे दास

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि**

**ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858,

E.mail : samselvaraj333@gmail.com

(...पान १ वरुन)

अभिषिक्त असे सेवक होते आणि देव त्यांचा नेहमी उपयोग करून घेत असे. त्यांच्यातील त्वेश-जहालपणा आता नष्ट झाला आहे. कृपया त्यांच्यासाठी आणि माझ्या कुटुंबासाठी प्रार्थना करा. आता त्यांचे मजवर प्रेम राहिलेले नाहि आणि मी अतिशय दु:खीत आहे.

या स्त्रीच्या जीवनावर अंधकार पसरला आहे. अशा स्थितीत देखील तीचे पतीवर प्रेम आहे आणि त्याने या दुष्ट मार्गातून बाहेर यावे आणि देवाला मान्य असे जीवन जगावे अशी अपेक्षा करीत आहे; परंतु तिच्या भावनांचा ऱ्हास झाला असून ती आजारी झाली आहे. ती अनेकदा मनात विचार करते, "हे देवा हे माझा नाश करण्याच्या बेतात आहे. मी आता हे आणाखीन सहन करू शकेन असे मला वाटत नाहि. मी आता कसे जीवन जगू?"

दुसऱ्या एका स्त्रीने कळविले:- मी आतड्याच्या भयंकर अशा आजाराच्या समस्येने सात वर्षापेक्षा अधीक काळ जगत आहे. माझ्या पतींची प्रकृति देखील ठीक नाहि, आम्ही जरी अनावश्यक गोष्टिवर खर्च करीत नाहि तरी देखील आमची आर्थिक स्थिती अतिशय गंभीर आहे. सध्या माझे एकोणनव्वद वर्षांचे वडील कर्करोगाने आजारी आहेत. तुम्ही आमच्या करीता प्रार्थना करण्यास मी विनंती करीत आहे.

या स्त्रीला दररोज पीडीत वडील, आजारी पती, असह्य शारिरीक वेदना आणि भयंकर आर्थिक स्थिती यांना सामोरे जावे लागत आहे. मी विचार करतो, तीने कितींदा तरी आरोळी मारली असेल, "प्रभू हे शत्रू मजकरीता बलवान आहेत. माझ्या सारखी दुर्बळ, असहाय व्यक्ति कशी काय जगू शकेन? मी यातून कशी बाहेर पडू शकेन ?

एका पाळकाने लिहून कळविले : "मागील जुलै महिन्यात माझी कर्करोगाने पूर्णपणे व्यापलेल्या पौरुषग्रथीवर (Prostate) शस्त्रक्रिया झाली. डॉक्टरांनी त्याच्या भोवतीच्या ग्रंथी देखील काढून टाकल्यामुळे जीवन कठीण झाले. सध्या मला मधुमेह आणि पोटाचा आजार देखील आहे. तुम्ही मजकरीता प्रार्थना कराल कां?"

किती राक्षसी अशा शत्रूंचा सामना या व्यक्तिला दररोज करावा लागत आहे! त्यांचा कर्करोग कदाचीत शिल्लक राहिल या भीतिमध्ये तो जगत आहे. त्याला मधुमेह आणि पोटाच्या आजाराशी झुंजावे लागत आहे. मी विचार करतो त्याने कितीदा तरी प्रश्न केला असेल, "मी या सर्वाला सतत कसे सामोरे जाऊ? या मधून मी कसा बाहेर येईल?"

प्रभुमधील एका वयस्कर बहिणीने लिहिले, मी मार्च महिन्यात ८१ वर्षाची होणार आणि मला मधुमेह आणि अस्थीरोग आहे माझी पाठ आणि पाय अशक्त-कमजोर आहेत, आणि मला चालता येत नाहि. मी एकटि राहात असल्यामुळे मला स्वत:लाच सर्व काम करावे लागते. माझ्याकडे पुरेसे पैसे नाहित आणि नातलग देखील नाहित: कृपया मज करीता प्रार्थना करा."

हि वेदनांनी व्यापलेली स्त्री दररोज सकाळी प्रयासाने उठते, ते जेवण तयार करण्यास आणि घर व्यवस्थित

ठेवण्याकरिता, आणि ते देखील कोणाच्याहि मदतीशिवाय. ती विचार करीत असेल, "मी पुढील दुसरा दिवसा करता पार पाडू शकेन ? मला जर बिछान्यावरून उठताच आले नाहि तर माझे काय होईल?"

दुसऱ्या एका प्रिय बहिणीने लिहिले. "मला माझ्या पतीने कळविले कि त्यांना शेवटच्या पायरीचा अन्ननलीकेचा कर्करोग आहे. तो अतिशय धार्मिक पती आणि माझ्या चौदा वर्षे वयाच्या मुलाचे वडिल आहेत. कृपया प्रार्थना करा की मला या परिस्थितीत खंबीर रहाता यावे या स्थितीत विश्वासात वाढ व्हावी."

हि स्त्री राक्षसी स्वरुपाच्या समस्येला दररोज सामोरी जात आहे, अशा अनेक बहिणींनी पत्राद्वारे आम्हाला कळविले आहे.

आज पर्यंतच्या माझ्या आयुष्यात ख्रिस्तीजनांना विवाहासाठी धडपड, आर्थिक समस्या, शारिरीक सत्वपरिक्षा, न संपणारे दुःख अशा प्रकारची संकटे, दुःख आणि वेदना झालेली मी ऐकली नाही. लोक विचारत आहेत, "मी यांतून कसा बाहेर येणार ? हे सर्व शत्रू मजकरिता प्रबळ आहेत. मी दुर्बळ, असाह्य, त्यांच्या बदल काही देखील करू शकत नाहि. प्रभु यामधून मी कसा बाहेर येवू शकणार ?"

सत्य हे आहे, कि या भयंकर अशा कोणत्याहि गोष्टिंनी देवाला आश्चर्य वाटले नाहि. आज ज्या प्रत्येक त्रासांना आणि समस्यांना सामोरे जात आहोत, त्या मनुष्य जातीला होणार हे त्याला आगोदरच होत्या आणि त्या सर्वांना सामोरे कसे जावे हे तो आम्हाला दाखवू ईच्छितो.

देव मोशेला जे दोन आशेचे शब्द बोलला ते आपल्याला आज देखील उपलब्ध आहेत. आपण जर त्याच्या सूचनेनुसार केले, तर त्या परिक्षांतून आपण केवळ बाहेरच येणार असे नाहि तर तो दिलले अभिवचन पूर्ण करण्यात विश्वसनिय आहे हे आपल्यात कळेल.

**१. देव आम्हाला आमच्या कोणत्याही शत्रूला घाबरू नका अशी आज्ञा देतो.**

**त्यांची भीति धरु नको...** (अनुवाद ७:१८).

"त्यांची" हा शब्द इस्त्राएल लोकांना प्रचंड, शस्त्रांनी युक्त अशा वचनदत्त देशांतील सामोरे गेलेल्या विदेशी राष्ट्राविषयी दर्शविती. आज आपणाकरिता "त्यांची" हा शब्द प्रत्येक समस्या, त्रास आणि जीवनांत सामोरे जावे लागत असणाऱ्या भयंकर कठीण गोष्टि दर्शविती.

तुम्ही प्रश्न कराल आम्ही कां भिऊं नये? कारण देव तसे म्हणत आहे! त्याकरिता इतर कोणत्याहि स्पष्टिकरणाची आवशक्यता नाहि. देव सर्वशक्तिमान, पुरेसा आहे आणि आपण सामोरे जात असलेल्या सैतानाचे सर्व बाले-किल्ले त्याला ठाउक आहेत. आपणावर टाकण्यात येऊ शकतील असे पाश, परिक्षा आणि मोह हे त्याला माहिती आहे आणि त्यामुळे तो आज्ञा करीत आहे. "तुम्ही त्याची भिती धरु नका".

देवाने आब्रामाला हि आज्ञा दिली. येथे हा माणूस अपरिचित, शक्तिशाली अशा राजांनी वेढलेल्या आपले काय होईल अशी कल्पना नसलेल्या देशात राहात होता. अशा स्थितीत त्याला देवाचा पहिला शब्द होता, "**भिऊ नको!" अब्रामास दृष्टांत रुपानें परमेश्वराचें वचन प्राप्त झाले तें असे, "भिऊ नको!" "मी तुझी ढाल आहे; मीच तुझें परम पारितोषिक आहे?"** (उत्पत्ती १५:१)

शेवटच्या वाक्यांशाचा अर्थ, "मी तुज सभोवती तट होईल, तुझा रक्षक, तुझा बचाव होईल?" सारांश, देव आब्रामाला म्हणत होता, "तूला अडचणींना सामोरा जावे लागणार आहे. तरी मी त्या सर्वांतून तुझा बचाव करीन." **अब्रामाने देवाने त्याला दिलेल्या शब्दावर विश्वास ठेविला आणि अब्रामाचा हा विश्वास परमेश्वरानें त्याची नीतिमता असा गणिला.** (उत्पत्ति १५.६)

अब्रामाचा मुलगा इसहाक याला देखील हेच शब्द आले. तो देखील पलिष्टी जे त्याचा द्वेष करीत होते, त्याला त्रास देत होते आणि त्याने त्यांच्या देशातून निघून जावे असे इश्चित होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत राहात होता. शास्त्र वचनात म्हटले आहे; इसहाक पाण्यासाठी विहिर खणीत असे आणि प्रत्येक वेळी पलिष्टी ती येऊन बुजवून टाकीत असत. "... **ज्या विहिरी खणिल्या होत्या त्या सर्व**

(...पान ६ वर)


# नहेम्या बाईबल कॉलेज

**निवासी आणि सायंकाळीन कॉलेज**
**वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम**

**माध्यम : हिंदी/इंग्लीश**

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र
**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि**
**वरिष्ट पाळकांद्वारे ५४ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**Diploma in Ministry : One year**
**Diploma in Theology : Two years**
**Bachelor of Theology : Three years**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**
**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**
**Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858**
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ सप्टेंबर ते १८ ऑक्टोंबर २०२३ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ सप्टेंबर** : **एको ऑफ हिज कॉल** सेवेचा ५५वा वर्धापन दिन सोहळा आशीर्वादीत केल्याबद्दल

**२० सप्टेंबर** : आमच्या मुद्रणालयात १६ भाषेतील मासिक छापून ते मिशन क्षेत्रांमध्ये पाठविणे शक्य होऊ देत आहे.

**२१ सप्टेंबर** : देवाची आमच्या प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार यांच्या वर असलेल्या दये बद्दल.

**२२ सप्टेंबर** : एको ऑफ हिज कॉलच्या सर्व कर्मचारी वर्ग व त्यांच्या कुटुंबांना सुरक्षित ठेविल्या बद्दल

**२३ सप्टेंबर** : युट्यूब वरील ५मिनिटांच्या संदेशामुळे प्राप्त होत असलेल्या साक्षी बद्दल.

**२४ सप्टेंबर** : आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल, नहेम्या बायबल कॉलेज** व **पत्रव्यवहारा द्वारे बायबल अभ्यास क्रमा**वरील आशीर्वादा बद्दल.

**२५ सप्टेंबर** : **एको ऑफ हिज कॉल** मासिकासाठी समर्पित सहसंपादक दिल्या बद्दल.

**२६ सप्टेंबर** : मिशन क्षेत्रातील समर्पित सेवकांबद्दल

**२७ सप्टेंबर** : परिणामकारी कारागीरांद्वारे सतत कार्यरत असलेल्या मुद्रणालया बद्दल.

**२८ सप्टेंबर** : **नहेम्या बायबल कॉलेज** साठी निवासी आणि सायंकालीन विद्यार्थी पुरविल्या बद्दल.

**२९ सप्टेंबर** : **पत्रव्यवहाराद्वारे बायबल** आणि **थियॉलॉजीकल आभ्यासक्रमा**तील वाढी बद्दल.

**३० सप्टेंबर** : **बेलाचरी नहेम्या बायबल कॉलेज**साठी पाणी आणि सेवेज व्यवस्था प्राप्त करुन दिल्या बद्दल.

**०१ ऑक्टोबर** : एको ऑफ हिज कॉल मासिक सेवेकरिता समर्पित सहसंपादक देऊन सेवा आशीर्वादीत केल्या बद्दल.

**०२ ऑक्टोबर** : मुख्य आणि शाखा मंडळ्यांत प्रभावी वचन सेवे बद्दल.

**०३ ऑक्टोबर** : वरिष्ट पाळक आणि त्यांच्या समर्पित बहुविविध सेवा कार्याबद्दल.

## ✝ प्रार्थने करीत ा मुद्दे

**०४ ऑक्टोबर** : भारतातील संपर्क साधण्यात आला नाहि अशा लोकांपर्यंत पोहंचणे शक्य होऊ दिले.

**०५ ऑक्टोबर** : सर्व दुष्ट शक्तिपासून आमचे वरीष्ट पाळक पास्टर एस्. सॅम. सेल्वा राज यांना आणि कुटुंबाला सुरक्षित जीवन जगता यावे

**०६ ऑक्टोबर** : आमच्या कार्यालयीन व मुद्रालय कर्मचाऱ्यांच्या प्रकृती स्वाथ्याकरीता.

**०७ ऑक्टोबर** : **नहेम्या बायबल कॉलेज**च्या निवासी आणि सायंकालीन विद्यार्थ्यांच्या सुरक्षितते करीता.

**०८ ऑक्टोबर** : देवाने या महिन्यातील सर्व गरजा पुरवाव्यात.

**०९ ऑक्टोबर** : आमच्या सेवेच्या विस्तारा करीता आणि जगभरातील सुवार्ता प्रचार कार्या करीता.

**१० ऑक्टोबर** : आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे जीवन चरित्र्य लिहिण्यात यश प्राप्त व्हावे.

**११ ऑक्टोबर** : जागतिक शांतते करीता.

**१२ ऑक्टोबर** : जगभरातील मिशनऱ्यांच्या संरक्षणा करीता.

**१३ ऑक्टोबर** : मणीपूर राज्यात देवाने त्याची कृपा आणि दया वर्षावावी आणि मैथी व कुकी समाजात शांती प्रस्थापीत व्हावी.

**१४ ऑक्टोबर** : आमच्या 'इंग्रजी मासिकाचे सहसंपादक डॉ. रिचर्ड सॅम्युएल आणि मिसेस सुवार्ता, आमच्या मराठी सहसंपादक रेव्ह. शशिकांत तिवारी यांना जलद प्रकृती स्वास्थ्य लाभावे.

**१५ ऑक्टोबर** : जगभरातील निरनिराळ्या भागातील आर्थिक मंदी संपुष्टात यावी.

**१६ ऑक्टोबर** : नैसर्गिक आपत्तिपासून जगातील लोकांचे रक्षण व्हावे.

**१७ ऑक्टोबर** : देवाने सर्व देशांना त्याचे भय बाळगणारे पुढारी देवून आशीर्वादीत करावे.

**१८ ऑक्टोबर** : पददलीत्यांची आर्थीक उन्नति व्हावी.

(पान ४ वरुन)

**पलिष्ठ्यांनी मातीने भरुन काढिल्या.**'' (उत्पत्ति १६:१५)

इसहाक ज्या ज्या ठिकाणी गेला त्याला त्याच समस्या आल्या. एका विहिरीस त्याने 'एरोक' म्हणजे 'कलह' असे म्हटले. असे दिसते कि त्याला त्याच्या जीवनात कलहा शिवाय दुसरे कांहि आहे असे वाटले नाहि. त्याने विचार केला असेल, माझ्या कुटुंबाला आणि कळपाला पाणी कसे पुरविणार? आणि हे पलिष्ठि कोणत्या क्षणी आम्हास लूटण्यास येतात अशा स्थितीत माझ्या लेकरांची भीति विरहित कशी वाढ करु? ''हे देवा तूं मला या ठिकाणी कां ठेविलेस? मी यातून कसा बाहेर येणार?''

इसहाकाला शंकांच्या ढगांनी वेढले असताना देवाने त्याला अब्रामाला दिलेले शब्द दिले. ''**तुझा बाप अब्राहाम याचा देव मी =आहे; भिऊ नको, कारण मी तुजबरोबर आहे; मी आपला सेवक अब्राहम याच्या प्रीत्यर्थ तुझे कल्याण करीन व तुझी संतति बहुगुणित करीन**''. (उत्पत्ति २६:२४).

आज इसहाका प्रमाणे आपण अब्राहामाची लेकरे आहोत आणि देवाने अब्राहामाला आणि त्याच्या संततीला दिलेले अभिवचन आपल्याला देत आहे, ''**...तुम्ही जर ख्रिस्ताचे आहा तर अब्राहामाचे संतान आणि वचन द्वारा वारीस आहा**''. (गलती ३:२९) अब्राहामाला जो देव ढाल होता तोच देव आपल्या बरोबर सामर्थ्यशाली असा आहे.

आपल्या स्वर्गीय पित्याचें आपल्या प्रत्येक पावलागणीक लक्ष असते आणि तो आपल्या प्रत्येक संकटात, अडचणीत वारंवार आज्ञापितों भिऊं नका! आपल्या समस्या आपल्याला खाली पाडतील, आपला नाश करतील असे कधीहि वाटू देवू नका कारण तो आपली ढाल आहे हे आपल्याला समजले पाहिजे.

''**हे इस्राएला, तू धन्य आहेस, परमेश्वराने उद्धरिलेल्या प्रजे, तुज समान कोण आहे? तो तुझ्या साहाय्याची ढाल आहे, तुझ्या प्रतापाची तरवार आहे.**'' त्यामुळे ''**तुझे शत्रु तुला शरण येतील; तू त्यांची उंचस्थाने पादाक्रांत करिशील.**'' (अनुवाद ३३:२९). देव आपल्याला सांगत आहे., ''**मी तुम्हाला सोडीले आहे हे खरे नाहि! मी तुजवर संतापलो आहे आणि तुझ्या विरुद्ध असलेल्या शंत्रूच्या पुढे तुला दूर लोटले आहे. हि सर्व सैतानाची लबाडी आहे!**''

**सर्व बाजूंनी घेरलेल्या पापाशी झगडणाऱ्या सर्व ख्रिस्तीजनांना उद्देशून मी बोलू इच्छितो.**

तुमची पिच्छा न सोडलेली वासना किंवा सवईमुळे तुम्ही दररोज अतीशय दु:खीत अवस्थेत जागे होता कांय? ''या भयानक गोष्टी मजमध्ये अजुनहि जीवीत आहेत.'' अशा विचाराने तुम्ही यातनेत जगत आहा कां?''

तुमच्या अंत:करणात असलेले पाप देवाला ठाऊक आहे. तुम्ही त्याचा द्वेष करित आहात आणि त्याबद्दल अश्रु ढाळीले आहेत हे देखील तो जाणतो. आता तुम्ही मी तुझी ढाल आहे, तुझा रक्षणकर्ता, तुझा बचाव, सर्व शत्रूंच्या विरुद्ध तुझी तरवार आहे'' ''भिऊ नको'', तुज करीता मोहातून बाहेर येण्याचा मार्ग मला ठाऊक आहे आणि मी लढाई कशी करावयाची ते शिकवीन हा शब्द ऐकावा अशी त्याची इच्छा आहे.

दाविद हे जाणून होता, त्यामुळेच तो बोलू शकला, ...मी अरिष्टांस भिणार नाहि. स्तोत्र (२३.४). तो घाबरला तर सैतान विजयी होईल याची त्याला जाणीव झाली.

प्रियांनो, अशाच मार्गाने शत्रु तुमच्या विरुद्ध कार्य करितो. तुमच्या पापाची तुम्हाला भीति वाटावी/तुम्ही कदापी मुक्त होणार नाहि याची भीति परंतु देव सर्व दु:खीत, इजा झालेल्या संतजनांना म्हणतो:- ''भिऊ नका, तुमचे दु:ख मी पाहात आहे आणि ते मला ठाऊक आहे. मी सैतानाला तुझा नाश करण्याची परवानगी देणार नाहि.''

तुम्ही कदाचित विचाराल, ''मी काय केले पाहिजे? या सर्वामध्ये मला देवाची शांती आणि विश्रांती की प्राप्त होईल?''

त्याचे उत्तर मोशें आणि इस्राएलांना देवाने दिलेल्या शब्दात सापडते. समोर समुद्र, मागे शत्रु आणि पळण्यासाठी कोणताच मार्ग नाहि अशा वेळी देवाने त्यांना आज्ञाविले :- ''**भिऊ नका, स्थिर उभे राहा आणि परमेश्वर आज तुमचे तारण करील... परमेश्वर तुम्हांसाठी लढेल, तुम्ही उभे राहा.**'' (निर्गम १४:१३-१४)

''तुम्ही उभे राहा'' या शब्दांचा अर्थ काय? त्याचा अर्थ आता काळजी करावयाची नाहि, सर्व काही जाणून घेण्याची गरज नाही - तर देवाने त्यातून तुमच्या करिता मार्ग काढावा यावरच भरोसा ठेवावा. अशा वेळी इस्राएलांना पुढे जा (निर्गम १४:१५) असा सल्ला दिला तेच शब्द तुम्हाला देतो.

यहोशवाला देखील अवघड शत्रूंना सामोरे जावे लागले. त्याला आणि त्याच्या सैन्याला रात्रभर गीबोना पर्यंत चालावे लागले, जेथे त्यांना पाच एकत्रीत झालेल्या राजांच्या सैन्याला सामोरे जावे लागले.

यहोशवाने युद्धभूमिकडे दृष्टि टाकली, तेव्हा त्याला खाली दरी शक्तिशाली रथस्वारांनी आणि प्रशिक्षित सैन्य दिसले. त्याजकडे तर थकलेल्या, युद्धासाठी प्रशिक्षित नसलेले लोक होते.

त्या क्षणी यहोशवा भोवती निराशेचे ढग गोळा झाले असतील. त्याच्या मनात विचार आला असेल, ''प्रभु, आम्ही नुकतेच येथे आलो आहोत आणि आता या बलाढ्य सैन्याशी युद्ध करावे लागत आहे. कृपया, आम्ही काय करावे हे मला सांगा?''

वचनात म्हटले आहे :- ''**परमेश्वर यहोशवाला म्हणाला त्यांची भिती धरु नको; मी त्यास तुझ्या हाती दिले आहे, त्यातला एकही पुरुष तुझ्यापुढे टिकाव धरणार नाही.**'' (यहोशवा १०:८).

यहोशवा युद्धास जाण्याच्या अगोदरच देवाने विजय घोषीत केला. तो म्हणाला विजय अगोदरच प्राप्त झालेला आहे! शत्रू सैन्यांतील एकही सैनिक उभा राहिलेला नसणार. ''आता जा आणि युद्ध कर; हे समजुन की मी तुला विजयाचे वचन दिलेले आहे.''

हा क्रुसाचा संदेश आहे! आपल्याकरिता विजय अगोदरच जिंकला गेलेला आहे. आपल्याला कोणत्याही आणीबाणीला सामोरे जावे लागेल, कितीही शक्तिशाली कठीण स्थिती आपल्या पुढे असेल आपला विजय निश्चीत आहे. "**...ज्याने आपल्यावर प्रिती केली त्याच्या योगे या सर्व गोष्टित आपण विशेष विजयी आहोत.**" (रोम ८:३७).

याचा अर्थ आपणाला काहिच करावयाचे नाहि, फक्त उभे रहावयाचे आणि देवाने त्याचा दूत पाठवून आपल्या शत्रूचा नाश करावा. अशी अशा बाळगायची? नाही कदापी नाही! देवाने जरी आपला विजय घोषीत केला, तरी तो आपल्या करीता आपला भाग करणार नाही "**आणि या सर्वाखेरीज जिच्या योगे त्या दुष्टांचे सर्व जळते. बाण तुम्हाला विझवता येतील. ती विश्वासरुपी ढाल घेऊन उभे राहा. तारणरुपी शिरस्त्राण व देवाचें वचन अशी आत्म्याची तरवार, ही घ्या**", (इफिस ६:१६-१७).

शत्रूशी लढण्याकरिता आपल्याला तरवार उचलावी लागणार आहे. फरक एवढाच की देवानें आपल्याला बळ देण्याचे वचन दिले आहे. "**...जो देव आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या द्वारे आपणांला जय देतो त्याची स्तुती असो**". (१ करिंथ १५:५७).

पवित्र आत्मा आपल्या विश्वासाला प्रतिसाद देतो. आपण जेव्हा त्याला हाक मारितो, तो दैवी सामर्थ्यानिशी आपली शारिरीक कृत्ये नष्ट करण्याकरिता आपल्याकडे येतो. आपला भाग विश्वास आणि त्यानंतर देवाचा आत्मा आपल्या विरोधात येणाऱ्या दुष्ट शक्तिला विरोध करील असा विश्वास ठेवून चालावे.

**२) गतायुष्यात आमच्या सर्व शत्रूंचा त्याने कसा पराभव केला हे स्मरण करण्याची देव आम्हांस आज्ञापित आहे!!**

मोशेने इस्त्राएल लोकांना सुचना केली, "... **त्यांची भीति धरु नका. देव परमेश्वर याने फारोचे या सर्व मिसर देशाचे काय केले त्याचे चांगले स्मरण ठेवा; तुम्ही आपल्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिलेली संकटे, चिन्हे व चमत्कार, तसेच समर्थ भुज व उगारिलेला हात यांच्यायोगे तुमचा देव परमेश्वर याने तुम्हाला काढून आणिले याचे चांगले स्मरण ठेवा; त्याप्रमाणेच ज्या लोकांची तुम्हाला भीति वाटत आहे त्यांचे शासन तुमचा देव परमेश्वर करील.**" (अनुवाद ७:१८-१९)

किती सामर्थ्यशाली संदेश! मोशे इस्त्राएलांना आठवण करून देत आहे, "तुम्ही कोणत्या हि शत्रूंना सामोरे जात आहात, देवाने तुम्हाला त्यांच्यावर विजय देण्याचे वचन दिल आहे. त्याने फारोपासून तुमच्या वाडवडिलांची सुटका केली आणि तो तुमच्या करिता देखील आज तेच करणार आहे"!

"**...मिसर देशांतून निघाल्या दिवसाचे तुला जन्मभर स्मरण राहील अनुवाद.**" (अनुवाद १६:३) ... **तू मिसर देशांत दास होतास याचे तुला स्मरण राहावे...**" (अनुवाद १६:१२).

मोशेची लोकांना मागणी होती, "पूर्वीचे स्मरण करा! या अरण्यात तुम्हाला कठीण समयात असल्यासारखे वाटत असेल, तर मिसर देशात किती भयंकर परिस्थितीला तुम्ही सामोरे गेला याचे स्मरण करा. गुलाम असतानाचे जीवन कसे होते याचा विसर पडू देवू नका. आणि तुमची सुटका करण्याकरीता तुमचा बचाव करण्याकरिता आणि त्या सर्वातून तुम्हाला पवित्र करण्यासाठी जे सर्व केले ते सर्व आठवा!!!"

यशया संदेष्ट्याने देखील जे भयग्रस्त लोक होते त्याच्याशी देवाचे वचन बोलला. ही अशी वेळ होती, जेव्हा इस्त्राएलांना देवाने त्यांना सोडून दिल्याची खात्री पटली होती. ते शत्रू त्यांचे काय करणार या भीतिने थरथरले होते परंतु यशयाने त्यांना खात्री करुन दिली.

"**तुमचे सांत्वन करणारा मी, केवळ मीच आहे; तूं मर्त्य मनुष्याला, तृणवत् मानवपुत्राला भितेस अशी तूं कोण? आकाश पसरणारा, पृथ्वीचा पाया घालणारा परमेश्वर तुझा कर्ता, याला तूं का विसरलीस? जुलूम करणारा तुझा नाश करण्यास पाहत आहे म्हणून त्याच्या क्रोधास सारा दिवस एकसारखी कां भितेस? जुलम्याचा क्रोध उरला आहे कोठे?**" (यशया ५१;१२-१३)

देव संदेष्ट्याच्या द्वारे बोलला, "मी कोण आहे हे तूं विसरलास त्यामुळे तु भ्याला आहेस. तू माझ्या सामर्थ्यावर आणि तुला सोडविण्याच्या माझ्या क्षमतेकडे पाहण्या ऐवजी केवळ तुझ्या त्रासाकडे पाहात आहेस. तुझ्या जीवनावर माझा हात आहे याचा तुला विसर पडला आहे."

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

# PIT TO PALACE

**"नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !" (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## लांब दाढी असलेला देखणा पुरुष!

## HANDSOME MAN WITH LONG BEARD!

मी माझ्या चैन्नई मधील अकबर साहिब स्ट्रीट मध्ये असलेल्या भाड्याच्या घरातील बहुतेक जागा आमच्या पहिल्या मंडळीला वापरण्या करीता दिली. तेथील आमच्या शेजारी राहाणाऱ्या, मुस्लीम बांधवांना येशू ख्रिस्तांची सुवार्ता आवडत नव्हती. तरी देखील देवाने मी याच विभागात त्याचे कार्य करीत राहावे असे सुचविले.

माझ्या इतर सुवार्ता कार्यासहित आणि वैयक्तिक सुवार्ता कार्यासहित, मी दर रविवारी सकाळी ९ वाजता मंडळीची उपासना सुरु केली, उपासनेत जणू माझ्या समोर फार मोठा जमाव आहे अशा पद्धतीने माझे ॲकॉर्डीयन नावाचे वाद्य वाजवत गाणे गाण्याची सवय होती. विभागातील लोक इतर लोकांना ते आवडत नव्हते. त्यामुळे पहिल्या कांहि वर्षांमध्ये उपस्थिति फारच तुरळक, जवळ जवळ शून्य अशी असे.

एका विशिष्ठ रविवारी १९८४ सालात उपासने साठी सर्व तयारी केली. आणि देवाने थोडे तरी आत्मे उपासने करिता आणावे अशी आग्रहाने प्रार्थना करुन वाट पाहू लागलो. आदल्या रविवारी कोणीहि आहे नव्हते, म्हणून भी निराश होतो, आणि शारिरीक थकवा जाणवत होता. मी घरातील शेजारच्या खोलीत गेलो आणी दुःखीत मनाने खाटेवर अंग टाकून पडून होतो.

त्या वेळात, मन दृष्टात झाल. एक वृद्ध देखणी लांब दाढी असलेली व्यक्ति मुख्य प्रवेश दारातून उपासनेच्या हॉल मध्ये आत आली. त्याच्या मागे पुष्कळ लोकांनी प्रवेश केला. परंतु त्याचे चेहरे स्पष्ट दिसत नव्हते. त्याने इतर लोकांबरोबर हॉल मधील दिवे आणि पंखे सुरू केले, गुडघे टेकले आणि जीवंत देवाची आराधना करू लागले. त्या हॉल मधील आवाज इतका मोठा होता की मला स्वस्थ पडून राहाता येईना. त्यामुळे मी उठले आणि भित भितच हॉल मध्ये प्रवेश केला, परंतु तेथे कोणीहि उपस्थित नव्हते ती व्यक्ति आणि इतर लोक अचानक अदृष्य झाले

देवाचे सेवक रेव्ह डॉरैब्यू, त्यांची पत्नी सरीना बेबीन लॉरेन्स त्यांच्या नवीन जन्मलेल्या सहित काहि मिनीटांच्या अवधीनंतर हॉल मध्ये प्रवेश केला. ते म्हणाले, त्यांना देवाच्या आल्याने आज उपासने करितां जाण्यास सुचविले. त्यानंतर काहि मिनीटांनी आणखीन काही जण उपासनेत सामील झाले. त्यानंतर देवाने आमच्या मंडळीला अधिकाधीक आशीर्वाद देण्यास सुरवात केली.

आपला देव सर्व समयी चांगला आहे. तो कोणाच्याहि जीवनात कोणत्याहि समयी आणि कोणत्याहि मार्गद्वारे चमत्कार घडवू शकतो. तुम्ही देखील त्याने आज तुमच्या वैयक्तिक जीवनात मध्यस्थी करावी यासाठी याजवर भरोसा ठेवू शकता.

**परमेश्वराच्या दुताने दर्शन देऊन म्हटले, हे बलवान वीरा, परमेश्वर तुझा बरोबर आहे" (शास्ते ६:१२)**

************

तुझ्या जीवनातील देवाच्या चमत्काराबद्दल विचार करीताना कदाचीत तुला त्रास होईल. तूं कदाचित विचार करशील, "माझे जीवन एक लांब लचक असे भयंकर स्वप्न झाले आहे. आनंद करावा असे काहि मला मिळाले नाहि. मी देवाचे चमत्कार अनुभवितच नाहित तर त्यांचे स्मरण कसे करु."

तुम्हाला हे समजले पाहिजे की अनुभव विश्वासाला प्रेरणा देवू शकतो. परंतु ते विश्वासाचा पाया ठरु शकत नाहि. त्यामुळे देवाचे वचन येशू ख्रिस्ताने काय केले याकडे आपले लक्ष वेधते. त्याच्या आपल्या करीता वधःस्तंभावरील मिळविलेल्या विजयाचे स्मरण केले पाहिजे, आणि विश्वासाने त्याला आलींगले पाहिजे. केवळ तोच त्याच्या आत्म्याद्वारे आपल्याला विजयाकरीता बळ देतो.

**येशू ख्रिस्ताने म्हटले, "मी माझ्या पित्याकडे परत जातो परंतु तुम्हांस अनाथ असे सोडणार नाहि."**

येशू ख्रिस्त त्याच्या शिष्यास म्हणाला, "**...ज्याने मला पाठविले त्याजकडे मी आता जातो.**" (योहान १६:५). "...मी तुम्हांस अनाथ असे सोडणार नाही..." (योहन १४:१८) येथे 'आनाथ' या ग्रीक शब्दाचा अर्थ "हिरावून घेणे", "पितृहीन" असा आहे.

अनेकदा शिष्यांस वाटले तसे तुम्ही एकटे आहात आणि देव तुमच्यासाठी कांहि करीत नाही असे तुम्हाला वाटले असेल त्याला तुमची काळजी आहे याचा पुरावा दिसत नसेल आणि सैतान तुम्हाला खोटे बोलतो कि देवाच्या आत्म्याने तुम्हांला काही समया करिता सोडीले आहे आणि तुमच्या वृद्धपणात तो तुम्हाला त्यागणार.

परंतु विश्वास बसणार नाहि असा एक चमत्कार तुम्ही विसरु शकत नाही. तो म्हणजे, येशू ख्रिस्ताने त्याच्या सर्व

अनुयायाना दिलेले अभिवचन - ''मी तुम्हाला अनाथ असे सोडणार नाहि! मी तुमच्यासाठी किंमत भरली आहे!! तुम्ही माझे आहात!!!.''

तुम्ही कोणत्याहि परिस्थितीतून जातअसाल, तुमच्या स्वर्गीय पित्याने एकदा देखील तुम्हाला सोडून देण्याचा विचार केला नाहि आणि करणार देखील नाही. त्याचे अनंतकालीक, न मोडणारे अभिवचन ऐका.

**''...सीयोन म्हणाले, परमेश्वराने माझा त्याग केला आहे. प्रभु मला विसरला आहे, स्त्रीला आपल्या पोटच्या मुलाची करुणा येणार नाही एवढा तिला आपल्या तान्ह्या बाळाचा विसर पडेल काय? कदाचित् स्त्रियांना विसर पडेल, पण मी तुला विसरणार नाही पाहा, मी तुला आपल्या तळहातावर कोरुन ठेविलो आहे; तुझे कोट नित्य माझ्या दृष्टीसमोर आहेत.''** (यशया ४९:१४-१६).

हा परिच्छेद आपल्याला सांगत आहे, ''तुम्हाला संरक्षणाची गरज आहे, हे नित्य माझ्या डोळ्यांसमोर आहे! असा एकहि क्षण नाहि कि, तुझ्या सभोवती माझ्या अद्भुत भींति उभ्या करण्याची काळजी मला वाटली नाहि!! माझे संरक्षणाचे कुंपण सदैव तुझ्या भोवती आहे!!''

पाळकांच्या पत्नीसहित मला अशा माता ठाऊक आहेत - ज्यांनी त्यांच्या लेकरांचा त्याग केला आहे. काहि आठवड्यांपूर्वी एका पाळकांने आम्हाला लिहून कळविले, ''माझा विवाहाला पंचवीस वर्षे झाली आहेत, परंतु माझ्या पत्नीला इंटरनेट वर कोणी एक मनुष्य भेटला आणि तिने मला सोडून दिले. ती मला आणि लेकरांना सोडून घरातून निघून गेली. मी अजुनहि तिजवर प्रीति करतो आणि तिने घरी परत यावे असे इच्छितो, परंतु तिची इच्छा नाहि. मी सध्या अतिशय दु:खात आहे, मी रात्री झोपू शकत नाहि. मी यातून कसा सावरणार मला कळत नाही''.

देवाचे या पाळकांला उत्तर आहे, '' तुझ्या प्रीय पत्नीने जरी तुला कदाचित त्यागीले आहे - परंतु मी तुला कदापी त्यागणार नाहि. माझा कोट नित्य तुझ्या भोवती असणार!''

अनेक दशके त्यांच्या दारुड्या-व्यसनाधीन पती सोबत जीवन जगत असलेल्या अशा स्त्रियांकडून आम्हाला पुष्कळ पत्रे येतात त्यांच्या निराशे विषयी वाचत असताना मी विचारतो. ''प्रभु प्रामाणिक- विश्वसनिय स्त्रियांना आशेचे कोणत्याहि चिन्हारहित इतका समय का सहन करावे लागत आहे? मला कळत नाहि माझ्या पत्नीला इतक्या शारिरीक त्रासातून कां जावे लागत आहे. तिच्यावर अठ्ठावीस शस्त्रक्रिया करण्यात आल्या, त्यापैकी सहा कर्करोगा साठी होत्या- चाळीस वर्षापेक्षा अधिक काळ भयंकर यातना सहन केल्या. ईश्वरविज्ञान शास्त्रातील कोणत्याहि सेवकाला याचे कारण काय असावे हे मला समजावून सांगता आलेले नाही.''

तरी देखील, हरकत नाहि आपल्या पैकी कोणालाहि कशातूनहि जावे लागेल किंवा किती समय सहन करावे लागणार, या सर्वापेक्षा एक गोष्ट अतिशय सत्य आहे:-

## देवाची कृपा या सर्वांमध्ये आपणास राखण्यास पुरेशी आहे!

प्रेषित पौलाने देवाला विनंती केली, ''प्रभु कृपा करुन माझ्या शरिरातील या काट्यांतून माझी सुटका कर''! परंतु देवाने त्याला उत्तर दिले. ''...माझी कृपा तुला पुरेशी आहे...'' (२ करिंथ १२:९). देव त्याच्या सेवकाला म्हणाला, ''पौल, तुला या काट्यासहित जगावयाचे आहे. परंतु तुझ्या या वेदनेमध्ये, मी तुला सर्व गरज असलेली सर्व कृपा पुरविणार. मजकडे तुजकरिता न संपणारा पुरवठा उपलब्ध आहे!''

देवाची अशी इच्छा आहे, कि आपणास हे कळावे, त्याची कृपा इतर सर्व परिस्थितीतील सुटके पेक्षा अतिशय शक्तिशाली आहे कां? कारण जो कोण आहे याचे प्रकटिकरण त्याच्या कृपेत सामावलेले आहे सोप्या शब्दात, देवाची कृपा येशू ख्रिस्त पूर्णपणे सर्व पावित्र्यात तरी देखील प्रेमळ, दयाळू हृदयात प्रकट झालेला.

आपला स्वर्गीय पिता आपल्या प्रत्येक दु:खाकडे लक्ष देतो आणि अशी अभिवचने देतो :-

**''धार्मिकांचे तारण परमेश्वरापासून होते; संकट समयी तोच त्यांचा दुर्ग आहे.''** (स्तोत्र ३७:३९)

**''..कारण त्यांने स्वत: म्हटले आहे, मी तुला सोडणार नाहीच व तुला टाकणार नाहीच; यास्तव आम्ही धैर्यानें म्हणतो. परमेश्वर माझा साहाय्यकर्ता आहे; मी भिणार नाही; मनुष्य माझे काय करणार?''** (इब्री १३:५-६)

**''तुं भिऊ नको, कारण मी तुझ्या बरोबर आहे; घाबरु नको, कारण मी तुझा देव आहे; मी तुला शक्ति देतो; मी तुझे साहाय्यहि करितो; मी आपल्या धार्मिकतेच्या उजव्या हातानें तुला सावरितो.''**

**पाहा जे तुजवर क्षुब्ध झाले ते लज्जित व फजीत होतील, तुजशी झुंजणारे शून्यवत व नष्ट होतील. तुजशी लढणाऱ्यांस तूं धुडाळिशील पण ते तुला सांपडावयाचे नाहीत; तुजशी युद्ध करणाऱ्यांचा नायनाट होईल.**

**कारण मी परमेश्वर तुझा देव तुझा उजवा हात धरुन म्हणत आहे की, भिऊ नको, मी तुझे साहाय्य करितो... मी इस्राएलाचा देव त्यांचा त्याग करणार नाही.''** (यशया ४१:१०-१३-१७)

तुम्ही येशू ख्रिस्ताच्या कृपेद्वारे सर्व परिस्थिती मग ती आणीबाणी किंवा अपघात असो त्यातून पार होऊ शकता. मार्गात काहिही येवो. तुमच्याकरिता त्याजकडे आवशकतेपेक्षा अधीक कृपा आणि पवित्र आत्म्याचे सांत्वन उपलब्ध आहे!

**''यास्तव देवाच्या पराक्रमी हाताखाली लीन रहा, यासाठी की योग्य वेळी तुम्हांस उंच करावें.''** (१ पेत्र ५:६).

**''यास्तव आपले धैर्य सोडू नका, त्यापासून मोठे प्रतिफळ आहे.''** (इब्री १०:३५)

*******

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल

**यु ट्युब सबस्क्राईब करा**

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपा करुन आमच्या **एको ऑफ हिज कॉल यु ट्युब चॅनल** बघा व सबस्क्राईब करा. धन्यवाद

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-  आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th SEPTEMBER 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**